**मालमत्ता कराचे चतुर्थ वार्षिक कर पुर्ननिर्धारणाची कार्यवाही करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

क्र. नपप्र/२०१९/E-Gov/GIS/कक्ष-०८/ 3987

शासकीय परिवहन सेवा इमारत,

तिसरा मजला सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.

दिनांक : 22 NOV 2019

**परिपत्रक**

संदर्भ : १ . महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण २०१५/प्र.क्र.१५७/नवि-३३ दि. २०/०७/२०१५.

२. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २०१५/प्र.क्र.१५७/नवि-३३ दि. ०७/०९/२०१५.

३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - एनयुएलएम २०१७/प्र.क्र.४/नवि-२० दि. १२/०६/२०१७.

४. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: बीएमसी- २५१७/प्र.क्र.७३४/ नवि-२१ दि. ०३/११/२०१७.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या अनुषंगाने भौगोलीक माहीती प्रणाली (जी.आय.एस. मॅपिंग) प्रणालीवर आधारीत मालमत्ता करप्रणालीची राज्यातील क व ड वर्ग महानगरपालीका व सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तेथील सर्व मालमत्तांचे जी.आय.एस. सर्वेक्षण व मॅपिंग नगरपरिषद प्रशासन संचालनालया मार्फत करण्याबाबत सदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाने घोषित करण्यात आले. तसेच वरील २ व ३ च्या संदर्भित शासन निर्णयाप्रमाणे याबाबतच्या मार्गदर्शक सुचना शासनाने निर्गमित केल्या आहेत.

तथापि वरील संदर्भ क्रमांक ४ च्या शासन परिपत्रकामध्ये सदर योजना राबविण्याच्या अनुषंगाने सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून एकत्रितपणे योजना राबविण्यात येत असतानाही काही नगरपालिका/नगरपरिषदा यांच्यामार्फत त्यांच्या हद्दीतील मालमत्तांचे जी .एस.आय. आधारीत सर्वेक्षण व मॅपिग करण्यासाठी स्वतंत्ररित्या निविदा काढण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी जी.आय.एस. प्रणालीवर आधारित कर आकारण्याची योजना राबविण्यासाठी मालमत्तांचे सर्वेक्षण व मॅपिग करण्याकरीता नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून कार्यवाही करण्यात येत असल्याने, राज्यातील “क” व “ड” वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्यामार्फत स्वतंत्र निविदा प्रक्रीया राबविण्यात येऊ नये. अशा सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

या परिपत्रकाच्या अनुषंगाने काही महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीं यांचेकडून ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे जी.आय. एस. आधारित मालमत्ता कराचे सर्वेक्षण पूर्ण झाले नसल्यामुळे चतुर्थ वार्षिक कर पुर्ननिर्धारणाची कार्यवाही प्रलंबित आहे, त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान होत असल्याने; जी.आय.एस. पद्धतीचा वापर न करता कर पुर्ननिर्धारण पुर्वीप्रमाणेच प्रचलीत पद्धतीने करावे किंवा कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत पत्रे नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त झाली आहेत, त्या अनुषंगांने खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. वरील सदर्भ क्रमाक ४ परिपत्रकानुसार संचालनालयाकडून नगरपालिका/नगरपरिषदा यांच्यामार्फत त्यांच्या हद्दीतील मालमत्तांचे जी .एस.आय. आधारीत सर्वेक्षण व मॅपिग करण्यात येणार आहे. मात्र कर पुर्ननिर्धारण

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी या जी .एस.आय. डेटाचा वापर करुन नगरपालिका/नगरपरिषद स्तरावर करावयाची आहे. यासाठी तांत्रिक सहाय्य सर्वेक्षण कंपनीकडून पुरविले जाईल.

२. सदर निविदा प्रकीया फक्त सर्वेक्षण व मॅपिग बाबत असल्याने ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कर पुर्ननिर्धारण प्रलंबित आहे, तसेच जी.आय.एस. आधारीत सर्वेक्षण व मॅपिग करण्याचे काम सुरु झाले नाही, किंवा अपुर्ण आहे, **त्यांनी त्यांच्या प्रचलित पद्धतीने कर्मच्याऱ्यामार्फत मालमत्ता सर्वेक्षण करुन (जी.आय.एस. पद्धतीचा वापर न करता) कर पुर्ननिर्धारण करण्यास काही हरकत नाही.**

तरी वरील प्रमाणे प्रचलित पद्धतीने चतुर्थवार्षिक मालमत्ता कर पुर्ननिर्धारण करण्यास हरकत नाही, मात्र जी. आय. एस. पद्धतीचा वापर करुन कर पुर्ननिर्धारण करण्याच्या संदर्भ क्र. ४ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२७/११/१८

**(पांडूरंग जाधव)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

**प्रति:**

१. आयुकत, क आणि ड वर्ग महानगपालिका, सर्व.
२. प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन शाखा, विभागिय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.
३. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व.
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत, सर्व